संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी

# नाशिक महानगरपालिका,नाशिक
## समाजकल्याण विभाग
## कोटेशन नोटीस २०२५

कामाचे नांव :- नामनपा समाजकल्याण विभागांतर्गत दिव्यांगांसाठी सुरु करण्यात आलेल्या १ ते १२ विविध कल्याणकारी योजनांचे अर्ज ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करणे व मंजुरी प्रक्रियेपर्यंत सेवा देण्यासाठी डेटा एन्ट्री करणेकरीता एजन्सीची नियुक्ती करणेबाबत.

| अ.क्र. | तपशिल | अंदाजे एकुण अर्ज संख्या | प्रति अर्ज दर (सर्व करांसह) | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | दिव्यांगांसाठी सुरु करण्यात आलेल्या १ ते १२ विविध कल्याणकारी योजने अंतर्गत प्राप्त झालेले अर्ज कागदपत्रांसह स्कॅन करुन ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करणे व अर्ज मंजुर प्रक्रियेपर्यंत नेणे व आवश्यक अशी माहिती पेमेंट स्टेटमेंट एक्सेल स्वरूपात देणेबाबत. | ७००० अर्ज | | |

अटी / शर्ती

१) वरील कामाचे कोटेशन पत्रक (अटिशर्तीसह www. nmc.gov.in) या संकेत स्थळावर दि. २३/०७/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजे पावेतो उपलब्ध आहे.

२) कोटेशन पाकिट सादरीकरणाची अंतीम मुदत दि. २३/०७/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त झालेले कोटेशन पाकिट स्विकारले जाणार नाही, कोटेशन पाकिटे समाजकल्याण विभाग, राजीव गांधी भवन शरणपुररोड येथे स्विकारण्यात येतील.

३) सदरचे दरपत्रकात सर्व करासह दर नमुद करावयाचे आहेत. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही. कोटेशन सोबत पॅन कार्ड, वैध शॉप ॲक्ट दाखला तसेच जीएसटी नोंदणी बाबतचे कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय कोटेशनचा विचार केला जाणार नाही.

४) सेवा पुरवठादाराकडे संगणक, स्कॅनर, इंटरनेट इत्यादी सुविधा असणे आवश्यक आहे. तसेच सदर कामासाठी प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक राहील.

५) मक्तेदाराने सेवा पुरविताना त्याच्या वतीने वापरल्या जाणाऱ्या मनुष्यबळाचे ई.पी.एफ. (EPF), ई.एस.आय.सी. (ESIC) तसेच इतर सर्व लागू असलेल्या शासकीय कर व अधिभारांची अदा करण्याची पूर्ण जबाबदारी मक्तेदाराची राहील. मक्तेदाराने कामगार कल्याण कायद्याचे सर्व नियम व अटींचे पालन करणे आवश्यक राहील.

६) कोटेशन नोटिस मध्ये नमुद केलेली संख्या ही अंदाजे असुन त्यामध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे.

७) एकुण बिलाच्या रकमेतुन 5% सुरक्षा अनामत रक्कम कपात करणेत येईल. सहा महिन्यानंतर कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास अथवा प्रयोजन हेतू पुर्ण झाल्यानंतर मागणीनुसार सदरची रक्कम परत करणेत येईल.

८) कोणतेही कोटेशन स्विकारणे अगर नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील.

९) सदरचे दरपत्रकात सर्व करासह व अनुषंगीक खर्चासह दर नमुद करावयाचे आहेत. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.

नितीन नेर
उपआयुक्त (समाजकल्याण)
नाशिक महानगरपालिका,नाशिक

# नाशिक महानगरपालिका,नाशिक
## समाजकल्याण विभाग
## कोटेशन नोटीस २०२५

कामाचे नांव :- नामनपा समाजकल्याण विभागांतर्गत दिव्यांगांसाठी सुरु करण्यात आलेल्या १ ते १२ विविध कल्याणकारी योजनांचे अर्ज ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करणे व मंजुरी प्रक्रियेपर्यंत सेवा देण्यासाठी डेटा एन्ट्री करणेकरीता एजन्सीची नियुक्ती करणेबाबत.

सेवा तपशील:

१. ऑनलाईन पोर्टलवर विविध योजनांचे अर्ज अपलोड करणे
२. आवश्यक कागदपत्रांचे स्कॅन व अपलोड करणे
३. लाभार्थी माहितीची एंट्री करणे
४. अर्जाची स्थिती ट्रॅक करणे व अर्जाची मंजुरी प्रक्रियेपर्यंत सेवा देणे.
५: आवश्यक अहवाल/डेटा एक्सेल स्वरूपात देणे

कामाची मुदत :- कार्यादेश दिनांकापासुन २५ दिवसांत काम पुर्ण करणे बंधनकारक राहील.

कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत :- दिनांक २३.०७.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपावेतो

कोटेशनधारकाचे नाव व पत्ता :- ------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------

संपर्क क्रमांक (मोबाईल क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक) :----------------------------------------------

| अ.क्र. | तपशिल | अंदाजे एकुण अर्ज संख्या | प्रति अर्ज दर (सर्व करांसह) | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | दिव्यांगांसाठी सुरु करण्यात आलेल्या १ ते १२ विविध कल्याणकारी योजने अंतर्गत प्राप्त झालेले अर्ज कागदपत्रांसह स्कॅन करुन ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करणे व अर्ज मंजुर प्रक्रियेपर्यंत नेणे व आवश्यक अशी माहिती पेमेंट स्टेटमेंट एक्सेल स्वरूपात देणेबाबत. | ७००० अर्ज | | |

टीप: सर्व दरांमध्ये जीएसटी व इतर करांचा समावेश आहे.

सदर कोटेशनसोबत असलेल्या अटी शर्ती मी वाचले असुन मला त्या मान्य आहेत. सदर अटी शर्ती प्रमाणे मी काम करण्यास तयार आहे. त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे.

दिनांक :-

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का

कार्यालयीन उपयोगासाठी

# नाशिक मंहानगरपालिका,नाशिक
# समाजकल्याण विभाग
# सर्वसाधारण अटी शर्ती (कोटेशन)

1) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल.

२) कोटेशन नोटिस मध्ये नमुद केलेली संख्या ही अंदाजे असुन त्यामध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे

३) दिलेल्या मुदतीमध्ये काम करणे / सेवा पुरविणे आवश्यक आहे काही अपरिहार्य कारणास्तव सेवा पुरवठा करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणेबाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहिल. तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतिम राहील.

४) ज्यांची संपूर्ण किंवा भागशः कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र रु ५२०/-चे जनरल स्टंप पेपर वर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. जी.एस.टी करासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे. कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

५) मक्तेदाराने ठरविलेल्या कालावधीत व ठरलेल्या गुणवत्तेनुसार सेवा पुरविणे बंधनकारक राहील.

६) फॉर्म भरण्याची जबाबदारी :
लाभार्थ्यांचे फॉर्म शासनाच्या पोर्टलवर अचूक व पूर्ण भरून घेणे, आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करणे व फॉर्म मंजुरी होईपावेतो कामकाज करणेबाबतची संपूर्ण जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील.

७) गोपनीयता :
सर्व अर्ज व कागदपत्रांची माहिती अत्यंत गोपनीय राखावी. तृतीय पक्षाशी माहिती शेअर केल्यास सेवा रद्द केली जाईल व कायदेशीर कारवाई होईल.

८) किमान अपेक्षित साधनसामग्री व मनुष्यबळ:*
सेवा पुरवठादाराकडे संगणक, स्कॅनर, इंटरनेट इत्यादी सुविधा असणे आवश्यक आहे. तसेच सदर कामासाठी प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक राहील.

९) दरनिश्चिती : दर फक्त *प्रति मंजूर अर्ज* याप्रमाणे नमूद करावा. अपूर्ण, चुकीचे किंवा नाकारलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

१०) पेमेंट अटी : फक्त अंतिम मंजूर अर्जाप्रमाणेच निश्चित दराने पेमेंट अदा करण्यात येईल.

११) कालमर्यादा : सदर डेटा एंट्री करणेबाबतचे कामकाज २५ दिवसांत पूर्ण करणे आवश्यक राहील.

१२) तपासणी / ऑडिट : कोणत्याही वेळी महानगरपालिका अधिकारी कामाची तपासणी करू शकतात. त्रुटी आढळल्यास सुधारणा बंधनकारक राहील.

१३) सदरचे दरपत्रकात सर्व करासह दर नमुद करावयाचे आहेत. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही. कोटेशन सोबत पॅन कार्ड, वैध शॉप ॲक्ट दाखला तसेच जीएसटी नोंदणी बाबतचे कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय कोटेशनचा विचार केला जाणार नाही कोटेशन प्रस्ताव प्रति मंजूर अर्ज दर व सर्व करांसह असावा.

१४) एकुण बिलाच्या रकमेतुन ५% सुरक्षा अनामत रक्कम कपात करणेत येईल. सहा महिन्यानंतर कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास अथवा प्रयोजन हेतू पुर्ण झाल्यानंतर मागणीनुसार सदरची रक्कम परत करणेत येईल.

१५) मनुष्यबळ आणि शासकीय शुल्क :- मक्तेदाराने सेवा पुरविताना त्याच्या वतीने वापरल्या जाणाऱ्या मनुष्यबळाचे ई.पी.एफ. (EPF), ई.एस.आय.सी. (ESIC) तसेच इतर सर्व लागू असलेल्या शासकीय कर व अधिभारांची अदा करण्याची पूर्ण जबाबदारी मक्तेदाराची राहील. मक्तेदाराने कामगार कल्याण कायद्याचे सर्व नियम व अटींचे पालन करणे आवश्यक राहील.

१६) दंडात्मक कार्यवाही :- वरील अटींचे उल्लंघन झाल्यास संबंधित बिले रोखणे व करार रद्द करण्याचा अधिकार विभागास राहील.

नितीन नेर
उपआयुक्त (समाजकल्याण)
नाशिक महानगरपालिका,नाशिक

सदरचे अटी शर्ती मी वाचल्या असून सदरच्या अटी शर्ती मान्य व कबूल असुन त्याप्रमाने माल पुरविण्यास /सेवा पुरविण्यास / काम करण्यास मी तयार आहे. त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का